नि.दि.दा.क्र.१८८/२०१७
गोदाबाई विरुध्द आशा
नि.क्र.४१ पुढे सुरु

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ हयांची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु.**
**वादीतर्फे विधिज्ञ श्री. पी.एम. कांबळे**

६. हे म्हणणे खरे आहे की, दामाजी गायकवाड हयांचे पोस्टात देखील खाते होते. मला त्याबाबत माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, मी ते खाते चालवित होते. ते त्यांनी त्यांच्या हयातीत बंद केले होते, ती नेमकी तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दामाजी गायकवाड हयांचे सर्व आर्थीक व्यवहार मीच पहायचे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या पश्चात मी त्यांचे आर्थीक व्यवहार बघते. हे म्हणणे खरे आहे की, गोदाबाईंच्या मुली मंगल व उज्वला या दोघींचीही लग्ने झालेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कैफीयतीत एकूण किती परिच्छेद आहेत हे मला सांगता येणार नाही. तसेच माझ्या साक्षशपथपत्रात एकूण किती परिच्छेद आहेत हे मला आज रोजी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या दाव्यातील मजकूर मला सांगता येणार नाही तसेच त्यांनी मागणीच्या कॉलममध्ये काय लिहले हे सुध्दा मला सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, दामाजी शासकिय नोकरीत होते. नोकरीच्या ठिकाणी पत्नीच्या नावाची नोंद असल्याबाबत मला माहित नाही. मी त्याबाबत ऐकून देखील नाही. दामाजी हयात असताना त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी माझ्या नावाची पत्नी नोंद व्हावी याकरीता मी प्रयत्न केले नव्हते. वादीच्या नावाची नोंद दामाजीची पत्नी म्हणून त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी झाल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अशिक्षीत असतानादेखील बँकेचे व्यवहार पाहते. हे म्हणणे खरे नाही की, मी दामाजीच्या नोकरीच्या ठिकाणी त्यांची पत्नी म्हणून वादीच्या नावाची नोंद असल्याबाबत माहिती मिळविण्याकरीता प्रयत्न केला होता. मी दामाजीला त्यांच्या हयातीत त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी माझी पत्नी म्हणून नोंद व्हावी म्हणून विचारणा केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादी ही दामाजींची कायदेशीर पत्नी

आहे हे मला माहिती होते.

८. दाव्याला असलेले जॉईंडर व नॉन जाईंडर हे तत्व मला कळत नाही. तसेच आवश्यक पक्षकार या शब्दाचा अर्थ देखील मला कळत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे सिध्दनाथवाडी वाई येथे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात नमूद घर मिळकतीव्यतिरिक्त वादीस इतर कुठेही घर नाही असे म्हटले तर बरोबर होईल. हे म्हणणे खरे आहे की, ते घर कुणाच्या नावे आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमूद घर बांधण्यापूर्वी वादी व तिच्या दोन मुली दामाजीसह सिध्दनाथवाडी वाई येथील जुन्या घरी राहत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत नमूद असलेल्या घराव्यतिरिक्त पसरणी येथे घर अस्तीत्वात आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते घर कुणाच्या मालकीचे आहे हे मला सांगता येणार नाही. त्या घरात माझे पती व मी राहत होते. तसे दर्शविण्याकरीता कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही.

९. माझे पसरणी येथील मतदार यादीत नाव आहे. पसरणी येथील ते घर कुणाच्या मालकीचे आहे याविषयी मी कधीही माहिती घेतलेली नाही. मी पसरणी येथे एकूण कितीदा मतदान केले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या घराशी माझा कोणताही संबंध नसल्याने व मी तेथे कधीही राहिले नसल्याने मला तेथे कितीदा मतदान केले हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पसरणी येथील ते घर वादी गोदाबाई हिच्या नावे आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ते घर तिने आता तिच्या नावे केले आहे. दोन ते तीन वर्षांपूर्वी मी त्या घराचा उतारा काढलेला आहे व तो माझ्याकडे घरी उपलब्ध आहे. त्या उता-यात मालक सदरी कुणाचे नाव आहे, त्याचे क्षेत्रफळ किती आहे तसेच भोगवटादार म्हणून कुणाच्या नावाची नोंद आहे याबाबत मला सांगता येणार नाही. सदरचे घर बांधल्यापासुन ते आजपर्यंत त्याची वार्षीक घरपटटी किती आहे हे मला सांगता येणार नाही. तथापि, मी एकदा रुपये ९००/- घरपटटी भरली आहे. मी कोणतीही नोकरी करीत नाही. माझ्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी घरपटटी भरण्याचे काहीएक कारण नव्हते.

१०. माझे जन्मगाव आसले आहे. तेथे माझे आईवडील नाहीत. माझ्या वडीलांचे नाव भागवत कांबळे व आईचे नाव लक्ष्मी कांबळे असे होते. ते आज रोजी हयात नाहीत. मला आज रोजी कुणीही भावंडे हयात नाहीत. पूर्वी मला तीन भाउ व एक बहिण होती. माझ्या बहिणीचे नाव उषा चव्हाण असे होते. ती लग्नानंतर कोरेगाव येथे नांदण्यास गेली होती.

*न्यायालयीन वेळ संपल्याने प्रकरण पुढील उलटतपासाकरीता तहकूब.*

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरी/-

दि.०३.०५.२०२४

(आर.एम. भेंडे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
वाई.